# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

स्टेशन रोड, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)

"In Pursuit of Technical Excellence"

(0240) 2366101, e-mail – workshop@geca.ac.in  web : www.geca.ac.in


जा.क्र. शाअमछसं/नि.वि.नोटीस / २०२६/2705  दिनांक: 13 AUG 2026

**जाहिर निविदा सुचना : ०२/२०२६/ नि. साहित्य**

प्रति,
सर्व संबंधीतास / नोटीस बोर्ड / संस्थेचे संकेतस्थळ

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर येथील विगर जडसंग्रह, विनाकामाचे साहित्य, तुटफुट झालेले साहीत्य, भंगार इत्यादीचा विहित शासकीय पद्धतीने जाहीर लिलाव कायमस्वरूपी विल्हेवाट लावण्याचे प्रस्तावित आहे. सदर सामुग्रीचे फोटो सोबत जोडलेल्या परिशिष्ट- अ प्रमाणे आहे.

त्या अनुषंगाने संस्थास्तरावरील सर्वसमावेशक समिती तयार करून सदर साहित्य एकत्रीत करणे, तसेच कोणतेही जडसंग्रह नोंद असलेले साहित्य या प्रक्रीयेतून बाहेर जाणार नाही याची दक्षता घेण्या बाबत कार्यवाहीचे लेखी निर्देश करण्यात आले.

विगर जडसंग्रह निरूपयोगी वस्तु, तुटफुट साहित्य, भंगार, इत्यादी सामुग्री जशी आहे, जेथे आहे त्या स्वरुपात जाहीर लिलाव करण्यात येत आहे. इच्छुक खरेदीदार यांनी सामुग्री ची पहाणी करावी व त्याप्रमाणे दरपत्रक सादर करावे. लिलाव प्रक्रीया खालील प्रमाणे आहे.

१. सदर बाबतीत कारवाईत सामील होऊ इच्छितांनी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर येथे कर्मशाळा विभागात श्री. पी. एस. तेलंग, प्रपाठक ९८२२७६६२८६ व श्री. सुनील ढमे, भांडारपाल ८८३०९९५७८४ यांचे कडे संपर्क साधून रु २००० विना परतावा किमतीचे नमुना दरपत्रक विकत घ्यावे. प्रत्येक दरपत्रकाला वेगळा अनुक्रमांक आहे. झेरॉक्स / सत्यप्रत स्विकारली जाणार नाही. दरपत्रका सोबत दुकानाचे नोंदणी पत्र, जीएसटी प्रमाणपत्र, पॅन कार्ड, व अर्ज विकत घेतलेल्या पावतीची सत्यप्रत जोडावी लागेल. तसेच प्रत्येक दर पत्रकासोबत रु २०,०००/- इतक्या रक्कमेचा डीडी जोडणे आवश्यक आहे. सुरक्षा ठेव / अनामत रक्कम सोबत जोडलेले नसल्यास दरपत्रक रद्द समजण्यात येईल. चुकीचे भरलेले, अपूर्ण भरलेले, कागदपत्रे न जोडलेले, असे कोणतेही त्रुटी असलेले, दरपत्रक बाद ठरवण्यात येईल.
२. सर्व संबंधीतांनी प्रत्यक्ष येऊन पहाणी करावी, कोणतीही जडसंग्रह वस्तू, त्याचा भाग इत्यादी या लिलाव प्रक्रीयेतुन दिली जाणार नाही. असे काही आढळल्यास सदर वस्तू विनामुल्य परत घेण्यात येईल. निविदाकाराला सर्व सामुग्री स्वतः च्या खर्चाने उचलणे व वाहतूक खर्च स्वतः करणे आवश्यक आहे सामान उचलतांना, व वाहतूकी दरम्यान इतर कोणतीही तुटफुट झाल्यास सर्व जबाबदारी निविदाकाराची असेल.
३. निविदा विकत घेण्याचा कालावधी दि. १२.०८.२०२६ पासून ते दि. १८.०८.२०२६ रोजी दुपारी १४.०० पर्यंत आहे.
४. संपूर्ण भरलेला निविदा अर्ज सर्व कागदपत्रे व अनामत रक्कमेसह दाखल करण्याचा शेवटचा दिनांक १८.०८.२०२६ रोजी सायंकाळी १६.०० पर्यंत आहे. यानंतर अर्ज स्विकारले जाणार नाहीत.
५. लिलाव समिती मार्फत सर्व निविदा दि. १८.०८.२०२६ रोजी सायंकाळी १७.०० वाजता उघडण्यात येतील. यशस्वी ठरणाऱ्या निविदा काराने दि. १९.०८.२०२६ रोजी सायंकाळी १६.०० पर्यंत पुर्ण रक्कम भरणे अनिवार्य राहील. याबाबत कोणतीही तडजोड मान्य करण्यात येणार नाही. या वेळेनंतर लगेच द्वितीय निविदाकारास संधी देण्यात येईल.
६. महत्तम यशस्वी निविदाकाराने सदर सामुग्री दि. २०.०८.२०२६ सायं. १६.०० वाजेपर्यंत उचलणे अनिवार्य आहे. या नंतर सामुग्री घेऊन जाण्यास परवानगी देण्यात येणार नाही व सदर निविदाकाराचे सर्व रक्कम / सुरक्षा शुल्क शासन जमा करण्यात येईल.
७. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर येथील कर्मचारी किंवा त्यांचे नातेवाईक यांना या लिलाव प्रक्रीयेत भाग घेता येणार नाही. लिलाव प्रक्रियेच्या बाबतीत सर्व निर्णय मा. प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर यांचे अखत्यारीत राखीव करण्यात आलेले आहेत.
८. **वरीलपैकी कोणत्याही अटी व शर्ती मान्य नसल्यास दरपत्रक सादर करण्यात येऊ नये.**

डॉ. संजय एस. डंभारे, प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय
छत्रपती संभाजीनगर – ४३१ ००५

% Dr Sathe -

## शासकिय अभियांत्रीकी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथील जडसंग्रह नोंद नसलेले निरूपयोगी साहीत्य,भंगार इत्यादी बाबतीत निवीदाकाराने भरावयाचे दरपत्रक

### भाग अ : निवीदाकाराची माहिती

१. नाव : ____________________

२. पत्ता : ____________________

३. दुकानाचे नाव : ____________________

४. दुकानाचा पत्ता : ____________________

५. जि एस टी क्र. : ____________________

६. पॅन क्र. : ____________________

७. दुरध्वनी क्र. : ____________________

८. ई मेल (असल्यास) : ____________________

SAMPLE

### भाग ब : निवीदाकाराने सादर करावयाचे प्रमाणपत्र

मी ____________________ वय ________

रा. ____________________ प्रमाणीत करतो

की, जाहीर निवीदा सुचना ०२/२०२६/नि.साहित्यच्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत. त्यानुसार

रु. २००० (विनापरतावा) भरला असुन त्याचा पावती क्र.__________ दि.__________ तसेच

अनामत रक्कम रु. २०००० चा डी.डी बॅंक नाव:____________________

शाखा __________ दि.__________ क्र.:__________ सोबत जोडला आहे.

### भाग क : निवीदा काराने लावलेली कमाल बोली

संबंधीत सर्व सामुग्रीचे अधिकतम मुल्य अंकात रु.__________ (अधिक जि एस टी)

अक्षरी रु. ____________________ (अधिक जि एस टी)

या रक्कमेवर मी बोली दाखल करत आहे.

SAMPLE

दिनांक : __________ निवीदाकाराची सही: __________

ठिकाण: __________ निवादकाराचे नाव: __________

जा.क्र. [illegible]/20.....

दिनांक :